<u>**प्रेसनोट दि.०८/०६/२०१९**</u>

<u>**सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे**</u>

**कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने पायी पेट्रोलिंग दरम्यान वडगाव भागातील जेष्ठ नागरीकांची भेट घेवुन जनजागृती**

---------------------------------------------------------------------------------------------------

दि. ०७/०६/२०१९ रोजी सायंकाळी १९.०० वा. २०.०० वा. चे दरम्यान वडगाव पोलीस चौकीचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक एस.बी.जाधव सोबत पोलीस स्टाफ यांचेसह वडगाव कॅनॉल ते हिंगणे दरम्यान वॉकींगट्रॅक या भागात पायी गस्त करुन वॉकींग करीता आलेल्या जेष्ठ नागरीकांची भेट घेवुन त्यांच्या दैनंदिन अडचणींबाबत त्यांच्याशी चर्चा करुन योग्य ते मार्गदर्शन केले. पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटीं पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात तसेच इतर जेष्ठ नागरीकांच्या अडचणी असल्यास त्यांना त्वरीत सिंहगडरोड पो.स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळविण्याबाबत योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत. तसेच जेष्ठ नागरिकांसाठी असणारी हेल्पलाईन नं. १०९१ बाबत जेष्ठ नागरीकांना माहिती दिली. त्याचप्रमाणे जेष्ठ नागरीक यांना सायबर क्राईम, चैन स्नॅचिंग बाबत माहीती देवुन जनजागृती केली त्यांच्या समस्या ऐकुन घेवुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले.

